Pune Police

# प्रेस नोट

## खुनाच्या प्रयत्नाच्या गुन्ह्यात सुमारे ०३ वर्षे फरारी असलेल्या आरोपीस खंडणी विरोधी पथकाकडून अटक

पुणे महानगरपालिकेच्या निवडणूकीच्या पार्श्वभुमीवर शांतता व सुव्यवस्थता अबाधीत राहणेकरीता शरिराविरूध्दचे गुन्हे करणारे रेकॉर्डवरील गुन्हेगार चेक करीत असताना खंडणी विरोधी पथकाचे पोलीस नाईक किरण चोरगे यांना राजगड पोलीस स्टेशन पुणे ग्रामीण यांचेकडील सन २०१४ सालातील खुनाच्या प्रयत्नाचे गुन्ह्यातील फरारी आरोपी नामे अमोल कैलास थोपटे वय २६ रा. फ्लॅट न. डी-१/६, शिवशंकर सोसायटी के.के. मार्केटजवळ, बिबवेवाडी पुणे हा मार्केटयार्ड येथील पेट्रोलपंपासमोर आला असल्याची बातमी मिळाल्याने खंडणी विरोधी पथकाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक लक्ष्मण बोराटे यांचे मार्गदर्शना प्रमाणे सहा. पोलीस निरीक्षक सुनील गवळी व स्टाफने सदर आरोपीस शिताफीने पकडून त्याचेकडे चौकशी करुन त्यास पुढील कार्यवाहीकरीता राजगड पोलीसांच्या ताब्यात दिले आहे. सदर आरोपीविरूध्द सहकारनगर पोलीस स्टेशन येथे गर्दी, मारामारी व जबरी चोरीचा एक असे दोन गुन्हे दाखल आहेत. सन २०१४ मध्ये त्याने आपला मित्र सुधीर मसुरकर याच्या बरोबर जावून पुर्ववैमनस्यामधून नसरापुरजवळील एका गावात एका व्यक्तीवर प्राणघातक हल्ला करुन त्यास जिवे मारण्याचा प्रयत्न केलेबाबत राजगड पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल आहे.

**वरील कारवाई ही प्रभारी अपर पोलीस आयुक्त गुन्हे श्री दिपक साकोरे, पोलीस उप-आयुक्त गुन्हे पुणे श्री. पी.आर.पाटील व सहा. पोलीस आयुक्त गुन्हे १ श्री. सुरेश भोसले यांचे मार्गदर्शनाखाली खंडणी विरोधी पथकाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. लक्ष्मण बोराटे, सहा पोलीस निरीक्षक सुनील गवळी व पोलीस स्टाफ किरण चोरगे, फिरोज बागवान, मंगेश पवार यांनी केलेली आहे.**